**सन २०११-१२ करिता राज्यातील नवीन अशासकीय औ.प्र.केंद्र व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औ.प्र.केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकड्यांना परवानगी देण्यांबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आयटीआय-२०११/प्र.क्र.११/व्यशि-३,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ मार्च, २०११

संदर्भ :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. आयटीआय-१०९९(८८)/व्यशि-१, दि.१९ मे,२०००.
२) संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांचे पत्र क्र.१२/अशा.औप्रकें प्रस्ताव/२०११/६१, दि.२४/०१/२०११.
३) डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचे पत्र क्र.DGE&T-१९ (१२)/२०१०-CD, दि.०६/०८/२०१०.
४) संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई-१ यांचे पत्र क्र.१२/अशा.औप्रकें/२०११/९३, दि.१७/०२/२०११.

**प्रस्तावना :-** सन २०११-१२ करिता राज्यामध्ये नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यांस व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्यांसाठी संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी वर्तमान पत्रात जाहिरात दिली होती या अनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याकरिता शासनाच्या उच्च स्तरीय समितीची दि.२९ जानेवारी,२०११ रोजी बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीनुसार कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यांस व विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्याच्या प्रस्तावांना परवानगी देण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** उपरोक्त पार्श्वभूमीवर आता सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरिता कायम विना अनुदान तत्त्वावर सोबतच्या **"प्रपत्र - अ"** (१३२ नवीन केंद्रे) व **"प्रपत्र - ब"** (११२ केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या) मध्ये दर्शविल्यानुसार नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्यांस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती :-**

**अ) नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांसाठी :- " प्रपत्र - अ "**

१) सदर नवीन केंद्रांना (" प्रपत्र - अ " प्रमाणे) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने केंद्र शासनाच्या ट्रेनिंग मॅन्युअलमधील मानकानुसार आवश्यक त्या बाबींची १०० टक्के पूर्तता करुन स्थायी समितीमार्फत आगामी होणारे निरीक्षण करुन घेऊन सदर व्यवसायांना डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी लागेल. तसेच डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचेकडून संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येऊ नयेत.

...२/-